# यावल महाविद्यालयात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांना विनम्र अभिवादन

यावल (प्रतिनिधी )येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज मर्यादित जळगाव संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास कक्षातर्फे युगपुरुष स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ.. सुधा खराटे होत्या तर अध्यक्षस्थान उपप्राचार्य प्रा.एम.डी. खैरनार यांनी भूषविले .

सुरुवातीला उपप्राचार्य प्रा.ए.पी. पाटील व डॉ. आर .डी .पवार यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन केले. डॉ. सुधा खराटे यांनी "राजमाता जिजाऊंचे योगदान" या विषयावर ऑनलाइन मार्गदर्शन केले की जिजाऊंनी व्यक्तिगत सुखा दुःखापेक्षा देशाचा व जनतेचा विचार केला .त्यांचे संस्कार व नैतिक अधिष्ठान यामुळे स्वराज्य मोठे झाले. राजमाता जिजाऊ म्हणजे त्याग व समर्पणाची मूर्ती होय. याप्रसंगी कोमल बोरणारे हिने स्वामी विवेकानंद यांच्या जीवन व कार्याविषयी माहिती दिली. अध्यक्ष प्रा.एम.डी. खैरनार यांनी प्रतिपादन केले की युगपुरुष स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांनी कर्तृत्वाने इतिहास निर्माण केला .दोघांच्या प्रत्येक विचाराला व आचाराला नैतिक अधिष्ठान होते .सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास कक्षाचे प्रमुख डॉ. सुधीर कापडे यांनी केले तर आभार डॉ. हेमंत भंगाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा .एस .आर .गायकवाड, डॉ. प्रल्हाद पावरा,प्रा.संजय पाटील, मिलिंद बोरघडे यांनी

सहकार्य केले .सदर कार्यक्रमात अनेक विद्यार्थी ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

